# भारतातील ग्रामिण विकासाच्या मार्ग मध्ये येणाऱ्या समस्या

**प्रा. डॉ ममता आर साहू**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
स्व व्ही के आर्ट्स कॉलेज रोहणा 442302
ई मेल - mamtadsahu26@gmail.com
मो. नं. - 7798110699

---

**प्रस्तावना :**

भारत हा खेड्यांचा देश आहे आज ही भारतातील एकूण लोकसंखेच्या दोन तृतीयांश लोकसंख्या ग्रामिण भागात राहते स्वातंत्र्या नंतर भारताचा जो विकास होत राहिला यात औद्योगिकरण आणि शहरीकरण या वर जास्त भर दिला होता या तुलनेत ग्रामिण भागातील विकास झालेला दिसून येत नाही म्हणूनच भारताची विभागणी दोन भागत केली जाते एक इंडियां व दूसरे भारत इंडिया हा शहरी भागाच प्रतिनिधित्व करणारा तर भारत हा ग्रामिण भागांचा प्रतिनिधित्व करणारा म्हणून ओळखला जातो ग्रामिण भारताच्या विकासा समोर अनेक पुढील अडचणी आहेत उदा : लोकसंख्या , भ्रष्टाचार, बेरोजगारी, भाषावाद, जातिवाद, दारिद्रय, कर्जबाजारीपणा, विकासातील विषमता, व्यसनधीनता, मानवी संसाधना चा निकृष्ट दर्जा या सारख्या समस्या दिसून येतात . देशाच्या सर्वांर्गिण विकासात सर्वात मोठी समस्या दिसून येते . विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी ग्रामिण विकास होणे आवश्यक आहे म्हणून आपणास ग्रामिण विकासा चा व त्या पुढील समस्या चा अभ्यास करणे आवश्यक आहे प्रस्तुत शोध निबंधा साठी पुढील प्रमाणे उदिष्टे निश्चित करण्यत आली .

**उदिष्टे :**

१) ग्रामिण विकासातील समस्या चा शोध घेणे.
२) ग्रामीण विकासाची संकल्पना समजून घेणे.

**गृहीतके :**

१) ग्रामीण विकासात समस्या दिसून येतात प्रस्तुत शोध निबंधासाठी गृहितके निश्चित करण्यात आले असून संशोधन पद्धती प्रस्तुत शोध निबंध लिहण्या करिता वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे . संदर्भ साहित्याचा आधार घेऊन प्रस्तुत शोध निबंध लिहण्यात आला आहे . तथ्य संकलना साठी दुय्यम संसाधनाचा वापर करण्यात आला आहे .

**ग्रामिण विकासाची संकल्पना :**

ग्रामिण विकास ही एक व्यावसायिक संकल्पना आहे ग्रामिण भागात राहणाऱ्या लोकांसाठी ग्रामिण लोकांच्या सामाजिक आर्थिक राजकीय व प्रशासकीय स्थितीत सुधारणा घडवून आणण म्हणजे ग्रामिण होय ग्रामिण विकास हा शब्द ग्रामिण आणि विकास या दोन शब्दापासून बनलेला आहे त्याचा अर्थ गावाच्या समग्र



Research Hub International Journal

विकासाशी संबंधित आहे असा एक समुदाय जो निश्चित संख्येने ग्रामिण क्षेत्रात राहतो त्यास गांव असे म्हणतात त्या गावांच सर्वांगिण विकास म्हणजे ग्रामिण विकास होय. ग्रामिण विकासाची व्याख्या पुढील प्रमाणे आहे जागतिक बँकेच्या विकास नीति १९७५ नुसार ग्रामिण विकास एक अशी रणनीती आहे की जी ग्रामिण भागातील गरीब निर्धन अल्प भूधारक सीमांत शेतकरी भूमिहीन शेतमजूर यांच्या सामाजिक आर्थिक जीवनात सुधारणा घडवून आणतो.

**ग्रामिण विकासाच्या समस्या :**

**१) दारिद्रय :**

भारतातील दारिद्रय पॉवर्टी इन इंडिया प्रा. वि म दांडेकर व निळकंठ यांनी लिहलेल्या या पुस्तकांत दारिद्रयांचे दरडोई खर्चाच्या आधारावर निकष ठरवून दिले आहे त्यानुसार भारतातील ४०% टक्के लोक दारिद्र आहेत दारिद्रय रेषेच्या आसपास हे लोक जीवन जगतांना दिसून येतात त्यांना मानवी मूलभूत गरजा सुद्धा मिळत नाहीत उदाः अन्न वस्त्र निवारा शिक्षण रोजगार या गरजांची पूर्तता ग्रामिण भागातून दिसून येत नाही ही देशाच्या विकासासाठी अतिशय गंभीर बाब आहे असे म्हणता येईल

**२) बेकारी :**

ग्रामिण भागात बेकारी निर्माण होण्याची कारणे अनेक दिसतात या मध्ये शेतीचे मागासलेपणा , भारतातील शेती ही इतर प्रगत राषट्रांच्या तुलनेत अप्रगत समजली जाते विशेषतः निर्सर्गा वर मोठ्या प्रमाणावर भारतीय शेती निर्भर आहे आधुनिक तंत्र ज्ञानाचा अभाव येथील शेती मध्ये दिसून येतो शेतीमाल व बाजारपेठांची समस्या, हंगामी स्वरूपांची शेती भांडवल व पिण्याचे पाण्याची कमतरता अश्या कारणांमुळे शेतीचा विकास झालेला नाही . यांच बरोबर बेकारीचे व दारिद्रयांचे एक मुख्य कारण लोकसंख्या वाढ हे सांगता येईल ग्रामिण भागात दैववादी परंपरावादी अज्ञानता अंधश्रद्धा निर्धनता निरक्षरता या मुळे सुद्धा लोकसंख्या वाढ झपाट्याने होत राहिली . वाढत्या लोकसंख्या ला हाताला काम मिळणे महत्वाचे असते परंतु ग्रामिण भागामध्ये शेती शिवाय इतर दुसरी उद्योग नाही त्यामुळे अनेक लोक बेकार झालेले दिसतात.

**3) व्यसनधीनता** :

ग्रामिण भागांत आज मोठया प्रमाणत व्यसनधीनता आढळून येते वाईट बाबींचे अनुकरण करुन दारू , सिगारेट, बीडी, जुगार या सारख्या व्यसना मध्ये वाढ होतांना दिसत अज्ञान हे व्यसनधीनता चे मुख्य कारण मानले जाते व्यसनधिनता प्रवृत्ती वाढल्याने ग्रामिण भागातील लोकांच्या खर्चा मध्ये वाढ होत आहे यांचा परिणाम आर्थिक विकासावर विपरित झालेल दिसून येते .

**४) कर्ज बाजारीपणा** :

ग्रामिण भागात मोठ्या प्रमाणावर कर्ज काढून सण उत्सव लग्न सभारंभ तेरवी या सारख्या कार्यक्रमा करिता कर्ज बाजारी होऊन रूढि परम्परेलांबळी जाऊन हे सर्व कार्य केले जाते हे कर्ज फेडण्यास विलंब लागतों त्यामुळे कर्ज बाजारी पणा मुळे आत्महत्ये चे प्रमाण वाढलेले आहे.

**५) मानवी संसाधनाच निकृष्ट दर्जा :**

मानवी गुणवत्ता शिक्षण आणि आरोग्य आणि कौशल्य या आधारावर मोजली जाते भारतीय ग्रामिण विकासात मानवी गुणवत्ता किंवी संपत्तीचा दर्जा निकृष्ट मानला जातो मोठ्या प्रमाणावर निरक्षरता अज्ञानता अंधश्रद्धा जूनी रुढि परम्परा कुपोषण जीवनसत्वांचा अभाव आरोग्य निरक्षरता लिंग भेद विषमता प्रतिगामी वस्ती या बरोबरच व्यावसायिक कौशल्य शिक्षणाचा अभाव या मुळे विकास प्रक्रिया हे काही अथी संथ व अडचणी ची बनलेली दिसून येते

**६) विकासातील विषमता :**

भारतात स्वातंत्र्य मिळाल्या वर मोठया प्रमाणा मध्ये तत्कालीन गरज म्हणून औद्योगिक करण्यास प्राधान्य देऊन शहरी भागात विकास साधण्यात येऊ लागला परंतू ग्रामिण भागांत म्हणावे तेवढे लक्ष देण्यात आले नाही यातून शहरी व ग्रामिण फरक मोठ्या प्रमाणात पडला जेवढा विकास पश्चिम महाराष्ट्राचा झाला या तुलनेत मराठवाड़ा व विदर्भाच विकास तेवढा झाल नाही

**सारांश :**

ग्रामिण विकासा चा संबंध ग्रामिण क्षेत्राच्या विकासासाठी विकासा शी आहे ग्रामिण विकासात सांस्कृतिक विकास शिक्षण आरोग्य सामाजिक गरजा व सुविधांचा विकास घडवून आणणाऱ्या प्रक्रियेचा समावेश होतो . भारताच्या विकासात ग्रामिण औद्योगिक विकास ग्रामिण सामाजिक समस्या दूर करून नागरी व ग्रामिण भागातील विषयता दूर करणे ग्रामिण भागातील दारिद्र्य दूर करून रोजगारांची निर्मिती करणे मानव संसाधनांचा विकास घडवून आणण्या साठी त्या दृष्टीने स्वंय रोजगार निर्माण करून विभागातील असमानता दूर करून ग्रामीण विकास साध्य केली जाऊ शकेल असे म्हणण्यास हरकत नाही.

**संदर्भ सूची** :

- डॉ. अवस्थी ए पी दृ विकास प्रशासन दृलक्ष्मी नारायण अग्रवाल - आग्रा - २००७ पृष्ठ १२८
- वर्ल्ड बैंक : रूरल डेव्हलपमेन्ट सेक्टर पॉलिसी पेपर में 1975 च. द . व. 03
- डॉ डी सी पंत ग्रामिण विकास कॉलेज बुक डेपो जयपूर 2009 पृष्ठ – 12
- भारतातिल ग्रामिण विकास संपादक डॉ अर्चना कांबळे ( जगतकर ) समाजशास्त्र विभाग प्रमुख न्यु कॉलेज कोल्हापूर प्रकाशक कुलसचिव , शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर २०१३
- संशोधक प्री सुरेश शंकर मुळक ' जिल्हा परिषदे मार्फत राबविण्यात येणाऱ्या ग्रामीण विकास योजनांचे मूल्यमापन (2002 ते 2012) विशेष संदर्भ पुणे व सातारा जिल्हा अप्रकाशित शोध प्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे